# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३६५/२०२४ दिनांक ०२/१०/२०२४

## प्रेस नोट

**"हातचलाखी करुन ए.टी.एम अदलाबदली करुन त्याव्दारे फसवणूक करणाऱ्या ०२ सराईत आरोपीतांना अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश."**

दिनांक २१/०९/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास तक्रारदार श्री. रमाकांत अभयकुमार मोहंन्ती, वय २२ वर्षे, (पुर्व), ता. वसई, जि. पालघर येथील इंडसइंड बँकच्या ए.टी.एम मधून पैसे काढण्यासाठी गेले असता त्यांच्या पाठीमागील अनोळखी इसमाने फिर्यादी यांना पैसे काढण्यास मदत करतो असे सांगुन फिर्यादी यांचे ए.टी.एम कार्ड हातचालाखीने बदलून फिर्यादीस त्यांचे कडील दुसरे बँकेचे ए.टी.एम कार्ड देऊन फिर्यादी यांचे बॅक खात्यातून त्यांचे परस्पर ५५,४५०/- रुपये काढून घेऊन फिर्यादी यांची फसवणूक केले बाबत दिनांक २२/०९/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्र. ७१२/२०२४ बीएनएस ३१८ (२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी, यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते. सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून सदर ए.टी.एम व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासुन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अनोळखी आरोपीत याचा पाठलाग केला. सदर सीसीटीव्ही फुटेज मध्ये आरोपीत हे एका वॅगनार या चारचाकी वाहनातून गुन्हा करण्याकरीता आल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस पथकाने सदर वॅगनार कारचा घटनास्थळ ते कळंबोली नवी मुंबई असा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पाठलाग केला असता सदर कार ही आरोपीत यांनी झुम या ॲप वरुन बुक केली असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. पोलीस पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीत १) **महेश पांडुरंग धनगर** वय-३७ वर्ष रा.कल्याण जि. ठाणे व २) **जितेश रामपाल जाटप उर्फ डब्बु**, वय- २९ वर्षे, रा. उल्हासनगर जि. ठाणे यांना ताब्यात घेतले आहे. आरोपीत यांच्याकडे तपास करता त्यांनी व त्यांचे आणखी दोन साथीदार यांनी सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असून आरोपीत यांनी अशाच प्रकारचे मुंबई सीएसटी, भिवंडी बायपास, मानखुर्द, भिवंडी काल्हेर रोड येथे गुन्हे केले असल्याबाबत तपासात सांगितले आहे.

सदर आरोपीत हे सराईत असून आरोपीत क्र. १) **महेश पांडुरंग धनगर, यांच्या विरोधात खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.**

| | |
|---|---|
| १) | भोसरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १६५/२०२१ भादविस कलम ४२०, ३७९, ३४ प्रमाणे, |
| २) | राहुरी पोलीस ठाणे गु.र.क्र. २१४/२०२१ भादविस कलम ४२०,४३९ सह आयटी ॲक्ट ६६(क), ६६(ई) प्रमाणे. |
| ३) | खोपोली पोलीस ठाणे गु.र.क्र. २००/२०२० भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे, |
| ४) | खेड पोलीस ठाणे गु.र.क्र. २६३/२०१७ भादविस कलम ४२० प्रमाणे, |
| ५) | सासवड पोलीस ठाणे गु.र.क्र. १२०/२०२१ भादविस ४२०, ३४ प्रमाणे, |
| ६) | बारामती तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र. ३३०/२०१८ भादविस कलम ४२० प्रमाणे, |
| ७) | शिक्रापुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २५०/२०१५ भादविस कलम ४२०,४३९,३४ प्रमाणे, |
| ८) | शिक्रापुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २४६/२०१६ भादविस कलम ४२०,३४, १२०(ब) प्रमाणे, |
| ९) | रत्नागिरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १६६/२०२० भादविस कलम ४२० प्रमाणे |

आरोपीत क्र. २) **जितेश रामपाल जाटप उर्फ डब्बु** वय-२९ वर्षे, **यांच्या विरोधात खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.**

| | |
|---|---|
| १) | कोळसेवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र.४६९/२०१६ भादविस कलम ४२०,३३६,३३८,४२७ प्रमाणे, |
| २) | अंबरनाथ पोलीस ठाणे गु.र.क्र.१२५७/२०१८ भादविस कलम ३०२,४५२,३४१,७५,१४३,१४७,१४८,१४९ प्रमाणे |
| ३) | उल्हासनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.१८७/२०१७ भादविस कलम ३५४ (ड), ५०४, पोस्को १२ प्रमाणे गुन्हे नोंद आहे. |

आरोपीत यांच्या विरोधात वरील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत. सदर गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रेय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मीक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखील मंडलिक, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पोहवा/नामदेव ढोणे, पो.अं.सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ - ०३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




----000----